४ ✓ परिशिष्ट क्र. ४

## तात्पुरत्या वीज पुरवठयासाठी हमीपत्र

दिनांक :

प्रति,
विभागीय अभियंता ग्राहक सेवा (द/उ),
.........................................
.........................................
.........................................

मी/आम्ही, खाली सही करणार ............................................................................................ ............................................................................................................................ या मागणीद्वारे तात्पुरत्या वीज पुरवठयाच्या जोडणीसाठी अर्ज केलेला आहे.

यासंदर्भात मी/आम्ही हमी देतो की, ज्या ज्या वेळी आपल्याला आवश्यक असेल त्या त्या वेळी मी/आम्ही आपल्या कर्मचारीवर्गाला संधारणेच्या जागेची किल्ली देईन/देऊ आणि संधारणेच्या जागी प्रवेश मिळवून देईन/देऊ.

आमच्या चुकीमुळे जर कामगार वर्गाला संधारणेच्या जागेची किल्ली मिळाली नाही अथवा त्यांना तेथे प्रवेश मिळाला नाही आणि त्यामुळे त्यांना योग्य वेळी तेथील मीटर काढता आले नाहीत, तर मी/आम्ही आपणाला अशी हमी देतो की, मीटरच्या काढून टाकण्याच्या तारखेच्या आणि प्रत्यक्षात काढून टाकलेल्या तारखेच्या मधल्या काळातील कमीत कमी रक्कम मी/आम्ही बेस्ट उपक्रमाला भरीन/भरु. जर अनामत रक्कम ही देयकाच्या रकमेपेक्षा कमी असेल तर उरलेली रक्कम आमच्या नावावर असलेल्या देयकाच्या नांवे दाखवावी. * जुन्या देयकाची प्रत सोबत जोडलेली आहे.

जर तात्पुरते जोडलेले मीटर अनधिकृतपणे हाताळलेले किंवा जळलेले आढळले तर मी/आम्ही एकंदर वीज खर्च झालेल्याच्या अंदाजित किंमतीइतकी रक्कम उपक्रमाला भरण्याची सुध्दा हमी देत आहोत.

* जुन्या देयकाची प्रत.

सही/-

परिशिष्ठ क्र. ५

<u>ग्राहक सेवा-ए,बी,सी,डी,ई,एफ (एस),एफ (एन), जी(एस), जी(एन) विभाग</u>

<u>गणेशोत्सवासाठी</u>

<u>सन २०१२-२०१३ करिता तात्पुरता वीज पुरवठा घेण्यासाठी अर्जदाराने पूर्ण करावयाच्या</u>

<u>अटी व नियम</u>

<u>अर्ज करतेवेळी खालील बाबींची पूर्तता करावी :</u>

१. तात्पुरत्या वीजपुरवठयासाठी मागणी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. हे अर्ज उपक्रमाच्या दादर, वडाळा आगार, इलेक्ट्रिक हाऊस कुलाबा, पाठकवाडी व ताडदेव बसस्थानक येथील संबंधित ग्राहकसेवा विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

२. सदर मागणी अर्जात मंडळाचे नाव व संपूर्ण पत्ता स्पष्ट व ठळक अक्षरात लिहावा.

३. अर्ज करतेवेळी अर्जासोबत मंडळाच्या अधिकृत प्रतिनिधीचा <u>दूरध्वनी / भ्रमणध्वनी</u> (मोबाईल) क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

४. अर्जासोबत ज्या केबिनमध्ये तात्पुरता वीजमापक हवा असेल त्याच केबिनमधील कुठल्याही एका वीजमापकाचे चालू महिन्याचे वीजदेयक जोडणे आवश्यक आहे.

५. विद्युत पुरवठा किती कालावधीसाठी हवा आहे त्या संपूर्ण कालावधीचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये नमुद करावा.

६. तात्पुरत्या वीजपुरवठयाच्या अर्जामध्ये जोडण्यात येणा-या विद्युतभारांची योग्य गणना करुन त्याची तपशीलवार यादी द्यावी.

७. थ्री फेज मीटरसाठी किमान १० कि.वॅट किंवा त्यापेक्षा जास्त विद्युतभार असणे आवश्यक आहे. अशा विद्युतभाराचा तपशील अर्जात नमुद करावा.

८. संबंधित पोलीस ठाण्याच्या परवानगीची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९. नवीन गणेश मंडळ नसल्यास आदल्यावर्षी तात्पुरत्या मीटरसाठी मंडळाने भरलेल्या रकमेची उपक्रमाने दिलेली पावती मागणी अर्जासोबत सादर करावी.

१०. विद्युत निरीक्षकाची परवानगी किंवा परवानगीसाठी त्या खात्याकडे केलेल्या अर्जाची प्रत मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

११. तात्पुरत्या विद्युत पुरवठयासाठी गणेशोत्सवाआधी कमीत कमी १० दिवस आगाऊ मागणी अर्ज नोंदविणे आवश्यक आहे.

१२. ज्या मंडळांची विद्युतभाराची मागणी २५ कि.वॅ. किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा मंडळांनी गणेशोत्सवाआधी कमीत कमी १५ दिवस आगाऊ मागणी अर्ज नोंदविणे आवश्यक आहे.